**जिल्हा परिषदेच्या वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्यांच्या धोरणाची अंमलबजावणी**

# महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास व जलसंधारण विभाग

**शासन निर्णय क्रमांक : जिपब-१०८/प्र.क्र.१६/आस्था-१४,**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक :- ३० एप्रिल, २००८.

**वाचा** :-

१) शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक : जिपब-३०७/प्र.क्र.१८/आस्था-१४, दि.४ मे,२००७

२) शासन निर्णय क्रमांक : जिपब-१०८/प्र.क्र.१६/आस्था-१४, दि.१४ फेब्रुवारी,२००८

जिल्हा परिषदेच्या वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांच्या जिल्हांतर्गत सर्वसाधारण बदल्या संदर्भात शासनाच्या उपरोक्त दि.४मे,२००७ शासन परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर सूचना विचारात घेता जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे धोरण अधिक पारदर्शी व प्रशासकीय दृष्टया सोयीचे करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय** :-

सदर दि.४मे,२००७ च्या शासन परिपत्रकान्वये, जिल्हा परिषदेच्या वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसदर्भात यापूर्वी देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना अधिक्रमित करुन, सोबतच्या परिशिष्ट-१ प्रमाणे सूचना / नियम निश्चित करण्यात येत आहेत. तसेच सदर सूचना / नियमांनुसार जिल्हा परिषदेच्या वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या संदर्भात कार्यवाही करण्यात यावी, असे आदेश देण्यात येत आहेत.

३. सदर नियमांचे काटेकोरपणे पालन करुन बदल्या बाबतची कार्यवाही करण्याची दक्षता मुख्य कार्यकारी अधिकारी / गट विकास अधिकारी यांनी घ्यावी. बदल्यांबाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यावर, मुख्य कार्यकारी अधिकारी / गट विकास अधिकारी यांनी परिशिष्ट-२ प्रमाणे विहीत केलेल्या विवरणपत्रांमध्ये माहिती भरुन दि.३० जून पर्यंत शासनाकडे पाठवावी.

तसेच या संदर्भात कोणत्याही प्रकारची अनियमितता होऊ नये यासाठी संबंधीत विभागीय आयुक्त यांनी देखील दक्षता घ्यावी. अनियमितता झाल्याबाबतची कोणतीही तक्रार उद्‌भवल्यास त्या संदर्भात विभागीय आयुक्त यांनी सखोल चौकशी करुन अनियमितता दूर करण्याची कार्यवाही करावी. तसेच कोणत्याही प्रकारच्या अनियमिततेस जबाबदार असणा-या संबंधीताविरुध्द नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

४. सदर शासन निर्णय संगणक सांकेतांक क्रमांक २००८०४३०१५२४१३००१ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यांत आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(र.ना.अंबरित)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) विभागीय आयुक्त (सर्व विभाग),
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
३) उपायुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व विभाग)
४) निवड नस्ती, कार्या.क्र.आस्था-१४, ग्रा.वि.व ज.सं.वि., मंत्रालय, मुंबई

## परिशिष्ट - १
## जिल्हा परिषदेच्या वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचा-यांच्या जिल्हांतर्गत बदल्यांबाबतचे नियम

अनुक्रमणिका


१) प्रकरण - १ :- बदलीने नेमणूक देताना पाळावयाच्या सूचना / नियम.

२) प्रकरण - २ :- जिल्हा परिषदेच्या वर्ग-३ च्या कर्मचा-यांच्या एका पंचायत समितीमधून अन्य पंचायत समितीमध्ये जिल्हांतर्गत बदल्यांबाबत नियम.

नियम १ :- नेमणूकीचा पदावधी
नियम २ :- बदल्यांची टक्केवारी
नियम ३ :- बदली करण्यास सक्षम प्राधिकारी
नियम ४ :- बदली करण्याबाबतची कार्यपध्दती
(क) प्रशासकीय बदलीकरीता प्रस्ताव तयार करताना
(ख) विनंतीनुसार बदलीकरीता प्रस्ताव तयार करताना
(ग) प्रशासकीय व विनंतीनुसार बदल्यांचे प्रस्ताव सादर करणे व आदेश काढणे

३) प्रकरण - ३ :- जिल्हा परिषदेच्या वर्ग-३ च्या कर्मचा-यांच्या पंचायत समिती क्षेत्रामधील जिल्हांतर्गत बदल्यांबाबत नियम

नियम १ :- नेमणूकीचा पदावधी
नियम २ :- बदल्यांची टक्केवारी
नियम ३ :- बदली करण्यास सक्षम प्राधिकारी
नियम ४ :- बदली करण्याबाबतची कार्यपध्दती
(क) प्रशासकीय बदलीकरीता प्रस्ताव तयार करताना
(ख) विनंतीनुसार बदलीकरीता प्रस्ताव तयार करताना
(ग) प्रशासकीय व विनंतीनुसार बदल्यांचे प्रस्ताव सादर करणे व आदेश काढणे

४) प्रकरण - ४ :- जिल्हा परिषदेच्या वर्ग-४ च्या जिल्हांतर्गत बदल्यांबाबत नियम

५) प्रकरण - ५ :- जिल्हा परिषदेच्या वर्ग-३ व वर्ग-४ च्या जिल्हांतर्गत बदल्यांच्या पदावधी वाढविणे व बदल्यांच्या कालावधीबाबत नियम

नियम १ :- पदावधी वाढविणे

## नियम २ :- बदल्यांचा कालावधी

<u>**परिशिष्ट-१**</u>

<u>**जिल्हा परिषदेच्या वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचा-यांच्या जिल्हांतर्गत बदल्यांसंदर्भात नियम**</u>

<u>**प्रकरण-१**</u>

**नियम :- बदलीने नेमणूक देतांना पाळावयाच्या सूचना**

सक्षम प्राधिकारी बदली करतांना पुढील सूचना पाळतील :-

१) पती-पत्नी दोघेही जिल्हा परिषदेचे कर्मचारी असतील तर, त्यांची शक्यतो एकाच ठिकाणी बदली करण्यांत यावी. तसे करणे प्रशासकीय दृष्ट्या शक्य नसल्यास, पती-पत्नी यांचे राहते घर आणि त्या दोघांचेही कामाचे ठिकाण या दोघांमधील अंतर ३० कि.मी.पेक्षा अधिक राहणार नाही याची काळजी घ्यावी.

२) जे कर्मचारी विधवा, कुमारीका, परितक्त्या किंवा अपंग आहेत किंवा जे कर्मचारी मतिमंद व्यक्तीचे अथवा मतिमंद मुलांचे पालक आहेत अशा कर्मचाऱ्यांनी बदलीसाठी विनंती केल्यास, त्याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात यावा.

३) ज्या कर्मचाऱ्यांची बदली करणे आवश्यक आहे अशा कर्मचाऱ्यांना त्यांच्या बदलीसाठी पसंतीची ३ ते ४ ठिकाणे कळविण्याची मुभा द्यावी. सर्वसाधारण बदल्या करताना कर्मचाऱ्यांनी कळविलेली पसंतीची ठिकाणे विचारात घेऊन प्रशासकीय सोय आणि कर्मचाऱ्यांची वैयक्तीक पसंती या दोन्ही बाबी विचारात घेऊन योग्य तो ताळमेळ राखून बदली करण्याबाबत निर्णय घेण्यात यावा.

४) आदिवासी भागात दिर्घकाल सेवा केलेल्या शिक्षकांना बिगर आदिवासी भागात बदली देण्यात यावी. तसे करताना सदर शिक्षकांची सातत्याने आदिवासी भागात झालेली सेवा विचारात घेण्यात यावी व सेवाजेष्ठता निकष लावण्यांत यावा.

५) आदिवासी वा नक्षलग्रस्त अशा संवेदनशील भागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करताना तेथे मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त राहणार नाहीत, तसेच रिक्त पदांच्या बाबतीत असमतोलपणा राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

६) बदल्या करताना ज्या पंचायत समिती क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात मंजुर असलेली रिक्त पदे आहेत त्या पंचायत समिती क्षेत्रातील पदे बदलीने प्रथम भरावीत. तसेच, सर्व पंचायत समिती क्षेत्रांमध्ये कमीची समानता राहील याची दक्षता घेण्यात यावी. रिक्त झालेल्या पदावर पर्यायी व्यवस्था ताबडतोब करण्यांत यावी.

७) ग्रामसेवक, विस्तार अधिकारी अशा कर्मचाऱ्यांच्या बदल्या त्यांच्या मूळ राहत्या तालुक्यात करण्यांत येऊ नये. त्यांच्या अन्य तालुक्यात बदल्या करताना बदलीचे ठिकाण त्यांच्या मूळ राहत्या गावापासून ३० कि.मी.च्या आंत नसावे.

८) एका पंचायत समिती क्षेत्रामधून अन्य पंचायत समिती क्षेत्रात बदली करताना, कर्मचा-याने पूर्वी सेवा केलेल्या पंचायत समिती क्षेत्रामध्ये त्याची पुन्हा बदली करू नये. तसेच एका पंचायत समिती क्षेत्रामधून अन्य पंचायत समिती क्षेत्रात बदली करतांना, कर्मचा-यास त्याच्या कार्यरत पंचायत समिती क्षेत्राच्या सीमेलगतच्या पंचायत समिती क्षेत्रात बदली देऊ नये, सीमेलगतच्या पंचायत समिती क्षेत्रापलीकडील पंचायत समिती क्षेत्रामध्ये बदली करण्यात यावी.

<u>स्पष्टिकरण</u> :- "सीमेलगतचे पंचायत समिती क्षेत्र" म्हणजे कर्मचारी ज्या पंचायत समितीमध्ये कार्यरत आहे त्याच्या सीमा प्रत्यक्षपणे ज्या-ज्या पंचायत समित्यांच्या क्षेत्रांशी संलग्न आहेत त्या सर्व पंचायत समित्यांचे क्षेत्र.

९) पंचायत समिती क्षेत्रांतर्गत बदली करताना कर्मचा-याने पूर्वी सेवा केलेल्या ठिकाणी त्याची पुन्हा बदली करु नये.

१०) प्रत्येक संवर्गातील एकूण कर्मचा-यांच्या १० टक्के प्रमाणात दरवर्षी बदल्या करण्यात याव्यात. त्यातील ५ टक्के बदल्या ह्या एका पंचायत समिती मधुन अन्य पंचायत समितीमध्ये आणि ५ टक्के बदल्या ह्या पंचायत समिती क्षेत्राअंतर्गत करण्यात याव्यात.

११) व्यपगत न झालेल्या रिक्त पदावर किंवा बदलीच्या प्रक्रीयेमुळे उपलब्ध होणा-या पदावरच कर्मचा-यांची बदली करण्यात यावी.

१२) विनंतीने करावयाच्या एकतर्फी किंवा आपसी बदल्यांसाठी कोणतेही भत्ते कर्मचाऱ्यास अनुज्ञेय राहणार नाही.

१३) बदली केल्यानंतर जर कर्मचारी त्यांच्या बदलीच्या ठिकाणी रुजू होत नसतील तर त्यांच्याविरुध्द नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यांत यावी.

१४) सैनिक व अर्धसैनिक जवानांच्या पत्नी / विधवा ह्या जिल्हा परिषद कर्मचारी असल्यास त्यांना सेवाकाळात दोन वेळा त्यांच्या पसंतीने बदली देण्यात यावी. त्यासाठी नेमणूकीच्या पदावधीची, तसेच बदल्यांच्या कालावधीची अट शिथिल करण्यात यावी.

१५) विस्तार अधिकारी (शिक्षण)/केंद्र प्रमुख/मुख्याध्यापक ही पदे पर्यवेक्षीय स्वरुपाची असून, सदर पदावर पदोन्नती सेवेच्या उत्तरार्धात होते. त्यामुळे त्यांची एका पंचायत समितीमध्ये १० वर्षे सेवा

पूर्ण होत नाही. त्यामुळे त्यांची ५ वर्षे सेवा पूर्ण झाल्यानंतर अन्य पंचायत समितीमध्ये प्रशासकीय बदली करण्यास परवानगी दयावी.

**********

## <u>प्रकरण-२</u>

## <u>जिल्हा परिषदेच्या वर्ग-३ च्या कर्मचा-यांच्या एका पंचायत समितीमधून अन्य पंचायत समितीमध्ये जिल्हांतर्गत बदल्यांबाबत नियम</u>

**नियम :- (१) नेमणूकीचा पदावधी:-**

क) एका पंचायत समितीमध्ये १० वर्षे सेवा झालेले कर्मचारी प्रशासकीय बदलीस पात्र होतील.

ख) एका पंचायत समितीमध्ये ३ वर्षे सेवा झालेले कर्मचारी विनंतीनुसार बदलीस पात्र होतील.

**नियम :- (२) बदल्यांची टक्केवारी** :-

प्रत्येक संवर्गातील एकूण कर्मचाऱ्यांच्या ५ टक्के प्रमाणात बदल्या करण्यात याव्यात. तसेच अशा रितीने टक्केवारीनुसार बदलीस पात्र झालेल्या कर्मचा-यांच्या संख्येपैकी निम्म्या संख्येच्या कर्मचा-यांच्या प्रशासकीय व निम्म्या संख्येच्या कर्मचा-यांच्या विनंतीनुसार बदल्या करण्यात याव्यात.

<u>स्पष्टिकरण</u> :- समजा एका जिल्हा परिषदेमध्ये प्रथमिक शिक्षक संवर्गातील कर्मचा-यांची एकुण संख्या १०,००० असेल, तर एका पंचायत समितीमधून अन्य पंचायत समितीमध्ये ५०० कर्मचा-यांच्या बदल्या करण्यात याव्यात. यातील २५० कर्मचा-यांच्या प्रशासकीय व २५० कर्मचा-यांच्या विनंतीनुसार बदल्या करण्यात याव्यात.

**नियम :- (३) बदली करणारा सक्षम प्राधिकारी -** मुख्य कार्यकारी अधिकारी .

**नियम :- (४) बदली करण्याबद्दलची कार्यपध्दती :-**

**क) प्रशासकीय बदलीकरिता प्रस्ताव तयार करतांना**-

(एक) पंचायत समिती क्षेत्रामध्ये १० वर्षे सेवा पूर्ण झालेल्या बदलीपात्र कर्मचाऱ्यांची संवर्गनिहाय स्वतंत्र वास्तव्य सेवाजेष्ठता यादी संबंधित गट विकास अधिकारी यांनी तयार करावी.

(दोन) वास्तव्य सेवाजेष्ठतेसाठी कर्मचा-याची त्या वर्षाच्या १ ऑक्टोबरपर्यंत झालेली सेवा गृहीत धरण्यात यावी.

(तीन) एका पंचायत समितीमध्ये पदोन्नतीमुळे वेगवेगळया संवर्गात सलग १० वर्षे सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांचाही संवर्गनिहाय स्वतंत्र वास्तव्य सेवाजेष्ठता यादीत समावेश करण्यात यावा.

(चार) कर्मचाऱ्यांची संवर्गनिहाय वास्तव्य सेवाजेष्ठता यादी व रिक्त पदांची स्थिती गट विकास अधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे पाठवावी.

(पाच) सर्व पंचायत समित्यांकडील बदलीसाठी पात्र कर्मचाऱ्यांच्या संवर्गनिहाय वास्तव्य सेवाजेष्ठता याद्या संबधित गट विकास अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्यावर, त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषद स्तरावरुन बदलीसाठी पात्र कर्मचाऱ्यांची संवर्गनिहाय वास्तव्य सेवाजेष्ठता यादी तयार करावी.

(सहा) जिल्हा परिषद स्तरावरुन प्रत्येक संवर्गातील एकूण कर्मचाऱ्यांच्या ५ टक्के एवढया बदलीपात्र कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात याव्यात. सदर ५ टक्क्यांमध्ये २.५ टक्के प्रशासकीय बदल्या व २.५ टक्के विनंती बदल्या असे प्रमाण ठेवण्यात यावे.

(सात) जिल्हा परिषद स्तरावरील संवर्गनिहाय वास्तव्य सेवाजेष्ठता यादीनुसार, प्रत्येक संवर्गातील प्रशासकीयदृष्टया बदलीपात्र असणा-या कर्मचाऱ्यांमधील वास्तव्याने सर्वात सेवाजेष्ठ असणाऱ्या कर्मचाऱ्यांची प्रशासकीयदृष्टया बदलीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निवड करावी. प्रत्येक संवर्गातील एकूण कर्मचा-यांच्या संख्येच्या २.५ टक्के प्रमाणात सदरहु निवड करण्यात यावी.

(आठ) उपरोक्त पध्दतीने निवडण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीयदृष्टया बदलीसाठीचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तयार करावा.

**ख) विनंतीनुसार बदलीकरिता प्रस्ताव तयार करताना :-**

(एक) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एक ठराविक तारीख निश्चित करून तोपर्यंत प्राप्त होणारे जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे बदलीबाबतचे विनंती अर्ज स्विकारावेत. तसेच लोक प्रतिनिधींकडून बदलीबाबत प्राप्त झालेले विनंती/शिफारस अर्जही विचारात घेण्यात यावेत.

(दोन) प्राप्त झालेल्या विनंती अर्जातील नेमणूकीच्या पदावधीनुसार बदलीस पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत संबंधितांकडून अहवाल / सेवा तपशील मागविण्यात यावा.

(तीन) प्राप्त विनंती अर्जावरुन बदलीस पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्यांची प्रत्येक संवर्गनिहाय वास्तव्य सेवाजेष्ठतेनुसार एक यादी तयार करण्यात यावी.

(चार) प्रत्येक संवर्गातील विनंतीनुसार बदलीपात्र असणा-या कर्मचाऱ्यांमधील वास्तव्याने सर्वात सेवाजेष्ठ असणाऱ्या कर्मचाऱ्यांची विनंतीनुसार बदलीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निवड करावी. प्रत्येक संवर्गातील एकूण कर्मचा-यांच्या संख्येच्या २.५ टक्के प्रमाणात सदरहु निवड करण्यात यावी.

(पाच) उपरोक्त पध्दतीने निवडण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या विनंतीनुसार बदलीसाठीचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तयार करावा.

**ग) प्रशासकीय व विनंती बदल्यांचे प्रस्ताव सादर करणे व आदेश काढणे** -

(एक) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासकीय व विनंतीनुसार बदलीसाठीचे प्रस्ताव सभापती, संबंधित विषय समिती यांना सहमती/ मान्यतेसाठी सादर करावेत.

(दोन) सदर प्रस्तावास सभापती, संबंधित विषय समिती यांनी **२ दिवसांत** सहमती /मान्यता दिल्यास वा दुरुस्ती सुचविल्यास, तो प्रस्ताव पुढे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष यांचे सहमतीसाठी सादर करण्यात यावा.

परंतु, सभापती, संबंधित विषय समिती यांनी सदर प्रस्तावावर **२ दिवसांत** कोणताही निर्णय न दिल्यास, तो त्यांनी सहमत केला आहे असे गृहीत धरण्यात यावे व प्रस्ताव पुढे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष यांच्या सहमतीसाठी सादर करण्यात यावा.

(तीन) जिल्हा परिषदेचे अध्यक्ष यांनी सदर प्रस्तावावर **४ दिवसांमध्ये** कोणताही निर्णय न दिल्यास, सदर प्रस्ताव त्यांनी सहमत केला आहे असे गृहीत धरण्यात यावे व त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशिष्ट ठिकाण न दर्शविता फक्त पंचायत समितीचे नाव नमूद करुन बदली करण्याबाबतचे आदेश निर्गमित करावेत. त्या आदेशास अनुसरुन बदली करण्यात आलेल्या पंचायत समिती मधील विशिष्ट गाव, कार्यालय, विशिष्ट शाळा देण्याबाबतचे तपशिलवार आदेश संबधीत पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी यांनी काढावेत.

(चार) सदर प्रस्तावास जिल्हा परिषदेचे अध्यक्ष यांनी सहमती दिल्यास वा त्यांनी सुचविलेली दुरुस्ती मुख्य कार्यकारी अधिकारी यांना मान्य असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यानुसार विशिष्ट ठिकाण न दर्शविता फक्त पंचायत समितीचे नाव नमूद करुन बदली करण्याबाबतचे आदेश निर्गमित करावेत. त्या आदेशास अनुसरुन बदली करण्यात आलेल्या पंचायत समिती मधील विशिष्ट गाव, कार्यालय, विशिष्ट शाळा देण्याबाबतचे तपशिलवार आदेश संबधीत पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी यांनी काढावेत.

(पांच) सदर प्रस्तावावर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष यांनी दुरुस्ती सुचविल्यास व ती दुरुस्ती मुख्य कार्यकारी अधिकारी यांना मान्य नसल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे मान्यतेसाठी पाठवावा. विभागीय आयुक्त यांनी त्यावर निर्णय घेऊन त्यांचा निर्णय **७ दिवसांत** मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कळवावा. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशिष्ट ठिकाण न दर्शविता फक्त पंचायत समितीचे नाव नमूद करुन बदल्यांचे आदेश निर्गमित करावेत. त्या आदेशास अनुसरुन बदली करण्यात आलेल्या पंचायत समिती मधील विशिष्ट गाव, कार्यालय, विशिष्ट शाळा देण्याबाबतचे तपशिलवार आदेश संबधीत पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी यांनी काढावेत.

**********

## <u>प्रकरण-३</u>

## <u>जिल्हा परिषदेच्या वर्ग-३ च्या पंचायत समिती क्षेत्रामधील जिल्हांतर्गत बदल्यांबाबत नियम</u>

**नियम :- (१) नेमणूकीचा पदावधी :-**

कार्यरत ठिकाणी ३ वर्षे सेवा झालेले कर्मचारी प्रशासकीय, तसेच विनंतीनुसार बदलीस पात्र होतील.

**स्पष्टीकरण :-** "कार्यरत ठिकाण" म्हणजे प्रत्यक्ष कामाचे ठिकाण असेल. उदाः-मुख्यालय, कार्यालय,शाळा इ.

**नियम :- (२) बदल्यांची टक्केवारी :-**

प्रत्येक संवर्गातील एकूण ५ टक्के कर्मचा-यांच्या बदल्या करण्यात याव्यात. तसेच अशा रितीने टक्केवारीनुसार बदलीस पात्र झालेल्या कर्मचा-यांच्या संख्येपैकी निम्म्या संख्येच्या कर्मचा-यांच्या प्रशासकीय व निम्म्या संख्येच्या कर्मचा-यांच्या विनंतीनुसार बदल्या करण्यात याव्यात.

**नियम :- (३) बदली करणारा सक्षम प्राधिकारी -** गट विकास अधिकारी.

**नियम :- (४) बदली करण्याबद्दलची कार्यपध्दती :-**

**क) प्रशासकीय बदलीकरिता प्रस्ताव तयार करतांना-**

(एक) कार्यरत ठिकाणी ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या बदलीपात्र कर्मचाऱ्यांची संवर्गनिहाय स्वतंत्र वास्तव्य सेवाजेष्ठता यादी संबंधित गट विकास अधिकारी यांनी तयार करावी.

(दोन) वास्तव्य सेवाजेष्ठतेसाठी कर्मचा-याची त्या वर्षाच्या १ ऑक्टोबरपर्यंत झालेली सेवा गृहीत धरण्यात यावी.

(तीन) एकाच कार्यरत ठिकाणी पदोन्नतीमुळे वेगवेगळया संवर्गात सलग ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांचाही संवर्गनिहाय स्वतंत्र वास्तव्य सेवाजेष्ठता यादीत समावेश करण्यात यावा.

(चार) पंचायत समिती क्षेत्रांतर्गत प्रत्येक संवर्गातील एकूण कर्मचाऱ्यांच्या ५ टक्के एवढया कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात याव्यात. सदर ५ टक्क्यांमध्ये २.५ टक्के प्रशासकीय बदल्या व २.५ टक्के विनंती बदल्या असे प्रमाण ठेवण्यात यावे.

(पांच) संवर्गनिहाय वास्तव्य सेवाजेष्ठता यादीनुसार, प्रत्येक संवर्गातील प्रशासकीयदृष्ट्या बदलीपात्र असणा-या कर्मचाऱ्यांमधील वास्तव्याने सर्वात सेवाजेष्ठ असणाऱ्या कर्मचाऱ्यांची प्रशासकीयदृष्टया बदलीसाठी गट विकास अधिकारी यांनी निवड करावी. प्रत्येक संवर्गातील एकूण कर्मचा-यांच्या संख्येच्या २.५ टक्के प्रमाणात सदरहु निवड करण्यात यावी.

(सहा) गट विकास अधिकारी यांनी उपरोक्त पध्दतीने निवडण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीयदृष्टया बदलीसाठीचा प्रस्ताव तयार करावा.

**ख) विनंतीनुसार बदलीकरिता प्रस्ताव तयार करताना-**

(एक) गट विकास अधिकारी यांनी एक ठराविक तारीख निश्चित करुन तोपर्यंत प्राप्त होणारे जिल्हा परिषद कर्मचा-यांचे बदलीबाबतचे विनंती अर्ज स्विकारावेत. तसेच लोकप्रतिनिधींकडून बदलीकरीता प्राप्त झालेले विनंती / शिफारस अर्जही विचारात घेण्यात यावेत.

(दोन) प्राप्त झालेल्या विनंती अर्जातील नेमणूकीच्या पदावधीवरुन बदलीस पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत संबंधितांकडून अहवाल/सेवा तपशील मागविण्यात यावा.

(तीन) प्राप्त विनंती अर्जावरुन बदलीस पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्यांची प्रत्येक संवर्गनिहाय वास्तव सेवाजेष्ठतेनुसार एक यादी तयार करण्यात यावी.

(चार) प्रत्येक संवर्गातील विनंतीनुसार बदलीपात्र असणा-या कर्मचाऱ्यांमधील वास्तव्याने सर्वात सेवाजेष्ठ असणाऱ्या कर्मचाऱ्यांची विनंतीनुसार बदलीसाठी गट विकास अधिकारी यांनी निवड करावी. प्रत्येक संवर्गातील एकूण कर्मचा-यांच्या संख्येच्या २.५ टक्के प्रमाणात सदरहु निवड करण्यात यावी.

(पाच) उपरोक्त पध्दतीने निवडण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या विनंतीनुसार बदलीसाठीचा प्रस्ताव गट विकास अधिकारी यांनी तयार करावा.

**ग) प्रशासकीय व विनंती बदल्यांचे प्रस्ताव सादर करणे व आदेश काढणे** -

(एक) गट विकास अधिकारी यांनी प्रशासकीय व विनंतीनुसार बदलीसाठीचे प्रस्ताव उप सभापती, पंचायत समिती यांना सहमतीसाठी सादर करावेत.

(दोन) सदर प्रस्तावास उप सभापती, पंचायत समिती यांनी **२ दिवसांत** सहमती दिल्यास वा दुरुस्ती सुचविल्यास, तो प्रस्ताव पुढे सभापती, पंचायत समिती यांचे सहमतीसाठी सादर करण्यात यावा.

परंतु, उप सभापती, पंचायत समिती यांनी सदर प्रस्तावावर **२ दिवसांत** कोणताही निर्णय न दिल्यास, तो त्यांनी सहमत केला आहे असे गृहीत धरण्यात यावे व प्रस्ताव पुढे सभापती, पंचायत समिती यांना सहमतीसाठी सादर करण्यात यावा.

(तीन) सभापती, पंचायत समिती यांनी सदर प्रस्तावावर **४ दिवसांमध्ये** कोणताही निर्णय न दिल्यास, तो त्यांनी सहमत केला आहे असे गृहीत धरण्यात यावे व प्रस्तावानुसार गट विकास अधिकारी यांनी बदली करण्याबाबतचे आदेश निर्गमित करावेत. बदली आदेशात कर्मचा-याच्या नेमणूकीचे ठिकाण स्पष्टपणे नमूद करण्यात यावे.

(चार) सदर प्रस्तावास सभापती, पंचायत समिती यांनी सहमती दिल्यास वा त्यांनी सुचविलेली दुरुस्ती गट विकास अधिकारी यांना मान्य असल्यास, गट विकास अधिकारी यांनी त्यानुसार बदली करण्याबाबतचे आदेश निर्गमित करावेत. बदली आदेशात कर्मचा-यांच्या नेमणूकीचे ठिकाण स्पष्टपणे नमूद करण्यात यावे.

(पांच) सदर प्रस्तावावर सभापती,पंचायत समिती यांनी दुरुस्ती सुचविल्यास व ती दुरुस्ती गट विकास अधिकारी यांना मान्य नसल्यास, गट विकास अधिकारी यांनी सदर प्रस्ताव अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे मान्यतेसाठी पाठवावा. अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्यावर निर्णय घेऊन त्यांचा निर्णय **७ दिवसांत** गट विकास अधिकारी यांना कळवावा. त्यानुसार गट विकास अधिकारी यांनी बदली करण्याचे आदेश निर्गमित करावेत. बदली आदेशात कर्मचा-यांच्या नेमणूकीचे ठिकाण स्पष्टपणे नमूद करण्यात यावे.

**********

## प्रकरण-४

## जिल्हा परिषदेच्या वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांच्या जिल्हांर्गत बदल्यांबाबत नियम

१) जिल्हा परिषदेच्या वर्ग-४ मधील कर्मचाऱ्यांसाठी  सामान्यपणे पदावधी निश्चित केला जाणार नाही.

२) ते ज्या ठिकाणी काम करीत असतील त्या ठिकाणाच्या बाहेर ज्या ठिकाणी त्यांनी बदली करण्याची विनंती केली असेल तेथे निर्विवाद रिक्त पद असल्याखेरीज किंवा परस्पर संमतीने बदली मागितली असल्याखेरीज किंवा त्यांच्या विरुध्द गंभीर स्वरुपाची साधार तक्रार आली असल्याखेरीज, त्यांची त्या ठिकाणाहून अन्यत्र बदली करण्यात येऊ नये.

३) एका पंचायत समितीमधून अन्य पंचायत समितीमध्ये बदली करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, तसेच पंचायत समिती अंतर्गत बदली करण्यास गट विकास अधिकारी हे बदली करणारे सक्षम प्राधिकारी असतील.

४) सदर बदल्या सामान्यपणे बदलीच्या कालावधीत करण्यात याव्यात.

**********

## प्रकरण-५

## जिल्हा परिषदेच्या वर्ग-३ व वर्ग-४ च्या जिल्हांतर्गत बदल्यांसाठी नेमणूकीचा पदावधी वाढविणे व बदल्यांच्या कालावधीबाबत नियम

**नियम (१) :- नेमणूकीचा पदावधी वाढविणे :-**

जिल्हा सेवेतील जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीचा नियम-१(१) व नियम-२(१) मध्ये निर्धारित केलेला पदावधी खाली विनिर्दिष्ट केलेल्या अपवादात्मक प्रकरणामध्ये वाढविण्यात यावा.

(क) नेमणूकीच्या ठिकाणी किंवा पदावर पदावधी पूर्ण केल्यानंतर, बदलीसाठी पात्र झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीसाठी एक वर्षापेक्षा कमी कालावधी शिल्लक असेल तेव्हा,

(ख) कर्मचारी एखाद्या विशिष्ट कामासाठी आवश्यक ती तांत्रिक अर्हता किंवा अनुभव धारण करणारा असेल व त्या पदासाठी योग्य असा बदली कर्मचारी तात्काळ उपलब्ध नसेल तेव्हा,

(ग) एखादा कर्मचारी, एखाद्या प्रकल्पावर काम करीत असेल व तो प्रकल्प पूर्णतेच्या शेवटच्या टप्प्यात असेल आणि त्याला तेथून काढून घेतल्यास प्रकल्प वेळेत पूर्ण होण्याचे धोक्यात येणार असेल तेव्हा आणि तसेच,

(घ) नियमानुसार मान्यताप्राप्त आणि जिल्हा पातळीवरील प्रातिनिधीक असलेल्या जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेच्या अध्यक्ष, सरचिटणीस व कोषाध्यक्ष या पदाधिकाऱ्यांचा पदावधी जिल्हा मुख्यालयी जास्तीत जास्त आठ वर्षापर्यंत वाढविता येईल. तसेच बदली केल्यानंतर सदर पदाधिकाऱ्यांनी बदलीच्या ठिकाणी तीन वर्षाचा कालावधी पूर्ण केल्यानंतर त्यांना पुन्हा मुख्यालयी नेमणूक देता येईल.

**नियम (२):- बदल्यांचा कालावधी :-**

जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बदल्या, सामान्यपणे, वर्षातून केवळ एकदाच एप्रिल, मे महिन्यात करण्यांत याव्यात. तसेच दिनांक ३१ मे नंतर जिल्हा परिषद कर्मचा-यांच्या बदल्या करण्यात येऊ नयेत.

परंतु, खाली नमूद केलेल्या परिस्थितीत वर्षातील कोणत्याही वेळी -

(एक) नव्याने निर्माण केलेल्या पदावर किंवा सेवानिवृत्ती, पदोन्नती, राजीनामा, पदावनती, पुन:स्थापना, निलंबन यामुळे किंवा बदलीच्या परिणामस्वरुप रिक्त झालेल्या पदांवर किंवा रजेवरुन परत आल्याच्या बाबतीत,

(दोन) अपवादात्मक परिस्थितीमुळे किंवा विशेष कारणामुळे बदली करणे आवश्यक असल्याबाबत,

(अ) एका पंचायत समितीमधून अन्य पंचायत समितीमधील बदली करण्यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची खात्री पटली असेल तर,

(ब) पंचायत समिती क्षेत्रांतर्गत बदली करण्यासंदर्भात, गट विकास अधिकाऱ्याची खात्री पटल्याने त्यांनी तसा बदलीचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे पाठविल्यास, तसेच त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचीही खात्री पटली असेल तर,

मुख्य कार्यकारी अधिकारी हे विभागीय आयुक्तांच्या पूर्व मान्यतेने,

(तीन) दरवर्षी दिनांक ३० सप्टेंबर अखेर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या निश्चित केल्यानंतर त्याआधारे जास्त वा कमी होणा-या प्राथमिक शिक्षकांचे समायोजन करतांना बदली करण्याची आवश्यकता असल्यास विभागीय आयुक्तांच्या पूर्व मान्यतेने,

(चार) या नियमातील प्रकरण - १ खालील नियम १४ मध्ये नमूद केल्यानुसार सैनिक व अर्धसैनिक जवानांच्या पत्नी/विधवा ह्या जिल्हा परिषद कर्मचारी असल्यास त्यांच्या बदल्या करतांना,

अशी बदली करण्यांत यावी.

**********

## परिशिष्ट - २

### जिल्हांतर्गत बदल्या संदर्भात माहितीचे विवरणपत्र

### (अ) जिल्हास्तरावरुन एक पंचायत समितीमधून दुसऱ्या पंचायत समितीमध्ये बदली

| अ.क्र. | संवर्ग | संवर्गातील एकूण कर्मचारी | बदलीस पात्र झलेले कर्मचारी | प्रत्यक्षात बदली केलेले कर्मचारी | किती बदल्या केल्या | | विहीत टक्केवारीपेक्षा किती जास्त कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रशासकीय | विनंती | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| विहीत मुदतीत बदल्या केलेल्या आहेत काय | प्रशासकीय बदल्या केलेल्या किती कर्मचाऱ्यांची कार्यरत पंचायत समितीमध्ये १० वर्षे सेवा पूर्ण झाली नव्हती | प्रशासकीय बदल्या केलेल्या किती कर्मचाऱ्यांच्या बदल्या वास्तव्य सेवा जेष्ठता डावलून करण्यात आलेल्या आहेत | प्रशासकीय बदल्या केलेल्या किती कर्मचाऱ्यांच्या पूर्वी सेवा केलेल्या ठिकाणी पुन्हा बदली देण्यात आली आहे | विनंतीनुसार बदल्या केलेल्या किती कर्मचाऱ्यांची कार्यरत पंचायत समितीमध्ये ३ वर्षे सेवा पूर्ण झाली नव्हती | विनंतीनुसार केलेल्या किती कर्मचाऱ्यांच्या बदल्या वास्तव्य सेवा जेष्ठता डावलून करण्यात आलेल्या आहेत | विनंतीनुसार बदल्या केलेल्या किती कर्मचाऱ्यांच्या पूर्वी सेवा केलेल्या ठिकाणी पुन्हा बदली देण्यात आली आहे | रकाना क्र.८ ते १५ मधील माहिती विहीत केलेल्या नियमानुसार नसल्यास त्याबद्दल खुलासा / स्पष्टीकरण |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

<u>परिशिष्ट - २</u>

जिल्हांतर्गत बदल्या संदर्भात माहितीचे विवरणपत्र

(ब) पंचायत समिती अंतर्गत बदल्या

| अ.क्र. | संवर्ग | संवर्गातील एकूण कर्मचारी | बदलीस पात्र झलेले कर्मचारी | प्रत्यक्षात बदली केलेले कर्मचारी | किती बदल्या केल्या | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रशासकीय | विनंती |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

| विहीत टक्केवारीपेक्षा किती जास्त कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत | केलेल्या बदल्यांमध्ये किती कर्मचाऱ्यांची कार्यरत ठिकाणी ३ वर्षे सेवा झाली नव्हती | | किती कर्मचाऱ्यांच्या बदल्या वास्तव्य सेवा जेष्ठता डावलून करण्यात आलेल्या आहेत | केलेल्या बदल्यांमध्ये किती कर्मचाऱ्यांच्या बदल्या सेवा जेष्ठता डावलून करण्यात आल्या आहेत | केलेल्या बदल्यांमध्ये किती कर्मचाऱ्यांना पूर्वी सेवा केलेल्या ठिकाणी पुन्हा बदली देण्यात आली आहे | रकाना क्र.८ ते १३ मधील माहिती विहीत केलेल्या नियमानुसार नसल्यास त्याबद्दल खुलासा / स्पष्टीकरण |
|---|---|---|---|---|---|---|
| | प्रशासकीय | विनंती | | | | |
| ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |